IMG-20210804-WA0012.jpg

Dr. Vidyullata Rahul Hande, Tifan, 2021, 12(1): pp 112-118, UGC Care listed




Scanned with CamScanner



# भारतीय चलन व अर्थव्यवस्थेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान

डॉ. विद्युल्लता राहुल हांडे

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार आणि दलितोद्धारक या दोन पैलूंमधूनच आज सर्वसामान्य भारतीयांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा परिचय असलेला दिसतो. त्यांची ही चौकटबद्ध प्रतिमा तयार होण्यास अनेक घटक कारणीभूत आहेत. यामध्ये सामाजिक,राजकीय,विविध चळवळी,सनातनी प्रवृत्ती,प्रसार माध्यमे असे अनेक रंग दिसून येतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर या व्यक्तिमत्वाचा शोध म्हणजे महासागराचा तळ शोधण्यासारखे आहे. आपण त्यांचा शोध घेत खोलवर पोहचल्यावर कळते की बाबासाहेब मुळचेअर्थशास्त्राचे विद्यार्थी होते. जागतिक आणि भारतीय अर्थशास्त्राबद्दल त्यांनी केलेले संशोधन पाहिल्यास असे लक्षात येते की त्यांनी अर्थशास्त्रातच आपली कारकीर्द घडवली असती,तर अर्थशास्त्राचे नोबेल पारितोषिक मिळवणारे ते पहिले भारतीय असते. अर्थशास्त्रात पहिले नोबेल मिळवणारे डॉ.अमर्त्य सेन बाबासाहेबांना अर्थशास्त्रातील आपले गुरूमानतात. अर्थशास्त्री बाबासाहेबांकडे कायमच जाणीवपूर्वक कानाडोळा करण्यात आला,हे सत्य स्वीकारावेच लागते. त्यांना भारतीय दलित चळवळीचे प्रणेते एवढयाच कक्षेत बद्ध करण्यामागे अनेकांचे हित आणि अनेकांची असुया दडलेली होती. बाबासाहेबांसारख्या बहुआयामी व्यक्तिमत्वाने ज्ञानाच्या प्रत्येक क्षेत्राला कवेत घेतलेले आहे. तो वेगळया मांडणीचा विषय आहे. थोर अर्थशास्त्रज्ञ म्हणून आपल्याला त्यांच्या अमूल्य योगदानाचा विचार येथे करायचा आहे. बाबासाहेबांच्या जीवनप्रवासाचे विभाजन दोन भागात करण्याचे ठरवल्यास १९२१ पर्यंतचा त्यांचा प्रवास अर्थतज्ज्ञ म्हणूनच सांगता येतो. त्यानंतर त्यांनी भारतीय पददलित-शोषित समाजासाठी आयुष्य वेचले,जगातील सर्वश्रेष्ठ अशी राज्यघटना निर्माण केली,बौद्ध धर्माच्या पुनरूज्जीवनातून शोषितांना ख-या धर्माचा मार्ग दाखवणारा दुसरा बुद्ध म्हणून ते ओळखले गेले.



Scanned with CamScanner

असे असले तरी त्यांच्यातील अर्थशास्त्रज्ञ त्यांच्या प्रत्येक क्षेत्रातील चिंतनात,लेखनात आणि कृतीत दृश्य-अदृश्य स्वरूपात वावरतच होता.

१) अर्थशास्त्राचा विद्यार्थी : डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मुंबई विद्यापीठातून अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्राची मूलभूत पदवी प्राप्त केल्यानंतर जगातील दोन महत्वाच्या विद्यापीठांत त्यांना अर्थशास्त्राचे उच्च शिक्षण घेता आले. अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठ आणि इंग्लंडमधील लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स. कोलंबिया विद्यापीठात बाबासाहेब जेमतेम तीन वर्षे होते. परंतु या काळात त्यांनी अर्थशास्त्राशी संबंधित विविध २९ अभयासक्रम पूर्ण केले. म्हणजे साधारण वर्षाला दहा या गतीने. पुढे मुंबईत तीन वर्षे प्राध्यापकी केल्यानंतर ते लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स या अर्थशास्त्राशी संबंधित अत्यंत आदरणीय संस्थेत दाखल झाले. येथे त्यांनी लिहिलेला आणि पुढे ग्रंथरूपात १९२३ साली प्रकाशित झालेला 'द प्रॉब्लेम ऑफद रुपी' हा प्रबंध सादर केला. आज जवळपास शंभर वर्षे होत आली तरी बाबासाहेबांनी आपल्या प्रबंधात केलेली अर्थशास्त्रीय मांडणी आणि विचार कदापि कालबाह्य झालेले वाटत नाही.'द प्रॉब्लेम ऑफद रुपी' मध्येच आजच्या भारतीय रिजर्व बॅंकेच्या निर्मितीचे बीज आहेत. हा प्रबंध ग्रंथरूपात जगासमोर येण्यापूर्वी पीएच. डी. साठी सादर झाला. त्यावेळी बाबासाहेबांनी जागतिक अर्थशास्त्रातील त्यावेळचे सर्वात मोठे व्यक्तिमत्व मानल्या जाणा-या प्रा. जॉन केन्स यांच्या मतांचे आणि त्यांनी बाबासाहेबांच्या मांडणीवर घेतलेल्या आक्षेपांचे अतिशय समर्थपणे खंडण केले. त्याकाळात प्रा. केन्स यांच्यासंदर्भात असे धैर्य करणे म्हणजे येरागबाळ्याचे काम नव्हते. कारण चलन आणि संबंधित विषयावर त्यावेळी प्रा. केन्स ही जागतिक पातळीवरील अंतिम अधिकारी व्यक्ती मानली जात असे. त्यामुळे बाबासाहेबांना आपल्या प्रबंधाची आणि त्यातील सिद्धांतांची मांडणी करतांना प्रा. केन्स यांना वळसा घालून जाणे शक्य नव्हते. केन्स यांच्या सिद्धांतांची व मतांची दखल प्रबंधात घेत असतांना,बाबासाहेबांनी त्यांच्या मतास आव्हान दिले. प्रा. जॉन केन्स यांच्या आर्थिक सिद्धांतात 'सुवर्ण विनिमय'पद्धत महत्वाची होती. सुवर्ण विनिमय पद्धतीत कोणत्याही देशाच्या चलन मूल्याची सांगड ही सोन्याच्या मूल्याशी घातली जाते. या पद्धतीचा अवलंब करणारे देश आपल्या कागदी चलनाचे रूपांतर निश्चित दराने सोन्यामध्ये करून ठेवतात. तसेच अशा देशांत सोन्याची किंमत सरकार निर्धारित करते. प्रा. केन्स यांच्या 'सुर्वण विनिमय'पद्धतीला बाबासाहेबांनी 'सुवर्ण प्रमाण'पद्धतीच्या आग्रहातून आव्हान दिले.

Scanned with CamScanner

२) प्रा केन्स आणि डॉ. आंबेडकर सैद्धांतिक संघर्ष : प्रा. जॉन केन्स यांची 'सुर्वण विनिमय'पद्धती त्यावेळी साक्षात ब्रिटिश सरकारला मान्य होती. म्हणजे जगाच्या किमान ८० % भूभागावर ही पद्धती मान्य असण्यासारखे होते. ब्रिटिशांची वसाहत एवढीच ओळख असणा-या भारतात 'सुर्वण विनिमय'पद्धतीने रुपयाची हाताळणी केली जावी असे ब्रिटिश सरकार आणि प्रा. केन्स यांचे ठाम मत होते. बाबासाहेबांनी आपल्या 'सुवर्ण प्रमाण' किंवा'सुवर्ण विनिमय परिमाण'(Gold Exchange Standard)पद्धतीने प्रा केन्स यांना आव्हान दिले,म्हणजे एका अर्थाने ब्रिटिश सरकारला भारताच्या बाबतीत आव्हान देण्यासारखे होते. केन्स यांच्या भारताच्या चलनविषयक धोरणाला अत्यंत अभ्यासपूर्ण आणि तर्कशुद्ध विरोध केला. त्यांनी मांडलेल्या सुवर्ण प्रमाण पद्धतीत प्रत्यक्ष चलनात काही प्रमाणात सोने वापरले जाते. भारतासारख्या अविकसित देशात सुवर्ण विनिमय पद्धती अयोग्य आणि घातक आहे. असे प्रतिपादन बाबासाहेबांनी केले. प्रा. जॉन केन्स यांचा सिद्धांत भारतासाठी उपयुक्त नाही,हे त्यांनी साधार सिद्ध करून दाखवले.

३) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची मांडणी : बाबासाहेबांनी आपल्या 'सुवर्ण प्रमाण'किंवा'सुवर्ण विनिमय परिमाण'(Gold Exchange Standard)पद्धतीच्या समर्थनार्थ इ. स. १८०० ते १८९३ या कालखंडातील चलनमूल्यांचा धांडोळा घेतला. त्यांनी शोधलेल्या संदर्भामधून त्यांनी प्रा. केन्स यांच्या सिद्धांतानुसार भारतासारख्या देशात चलनवाढीचा धोका असतो, हे सप्रमाण सिद्ध करून दाखवले. यामुळे भारतीयांचे शोषण सोडून काही होणार नाही,असा आरोप देखील त्यांनी ब्रिटिश सरकारवर केला. त्यांच्या मते सुवर्ण विनिमय पद्धतीचा अवलंब करून ब्रिटिश सरकार रुपयाची किंमत कृत्रिमरीत्या चढी ठेवत असून,त्यामागे ब्रिटनमधून भारतात निर्यात करणा-यांना जास्तीत जास्त नफा कसा होईल याचाच विचार करत आहे. बाबासाहेबांनी रुपयाच्या अवमूल्यनाची मागणी केली.रुपयाची सर्वसाधारण क्रयशक्ती जोपर्यंत निश्चित किंवा स्थिर केली जाणार नाही. तोपर्यंत रुपयाची किंमत अन्य कोणत्याही मार्गाने स्थिर होऊ शकरणार नाही. प्रा. केन्स यांची सुवर्ण विनिमय पद्धत ही केवळ दुखण्याचे निदान करणारी आहे,परंतु त्याच्या उपचारासाठी तिचा काहीच उपयोग नाही. हे अत्यंत ठामपणे मांडले. बाबासाहेबांचाहा सिद्धांत म्हणजे सर्वसामान्य भारतीयाचे कल्याण आणि देशाचा समतोल विकास याचे अत्यंत परिपूर्ण मिश्रण आहे. भारताच्या आर्थिक विकासासाठी बाबासाहेबांच्या चलन सिद्धांतासोबतच त्यांचा आयात-निर्यात आणि उत्पादन यांच्यासंदर्भातील विचार पाहणे महत्वाचे ठरते. तरच त्यांच्या चलन सिद्धांताचे परिपूर्ण आकलन



Scanned with CamScanner

होऊ शकते. त्यांनी आपल्या आर्थिक विचारात 'स्वदेशी' संकल्पनेला कठोर विरोध केला आहे. स्वदेशीविषयी त्यांचे मत पाहणे अत्यंत आवश्यक ठरते.

४) स्वदेशी भंपकपणा : भारताच्या राजकीय पटलावर महात्मा गांधींच्या उदयापूर्वीपासून आजतागायत स्वदेशीचा घोष सातत्याने केला जात आहे. स्वदेशी संकल्पनेला म. गांधींमुळे भारतीय मानसिकतेत चिरंतन अधिष्ठान मिळालेले दिसते. पारतंत्र्यात परदेशी मालाच्या होळीचा कार्यक्रम असो की स्वातंत्र्यात आत्मनिर्भर भारताचा इव्हेंट असो. भारतीयांना पेटवण्यासाठी उपयुक्त भावनेपैकी स्वदेशी एक महत्वाची भावना आहे. स्वदेशी म्हंटले की आपली राष्ट्रभावना तत्काळ जागृत होते.डॉ. आंबेडकरांनी २८ फेब्रुवारी १९२० रोजी 'मूकनायक'च्या अंकात स्वदेशी संदर्भात अतिशय नेमके विवेचन केलेले दिसते. ते म्हणतात,'स्वदेशी माल उत्पन्न करून हा दरिद्री देश सधन होईल. अशी प्रवचने सांगणा-या तारवठलेल्या स्वदेशी अर्थशास्त्रज्ञांनी लक्षात घ्यायला हवे की,परदेशी माल आयात होतो. याचे कारण तो कमी किंमतीत मिळतो. तसाच माल स्वदेशात उत्पन्न होत नाही. याचे कारण तो अधिक भावाचा पडल्यामुळे व्यापारात परदेशी मालापुढे त्याचा टिकाव लागत नाही. त्याचा टिकाव लागावा म्हणून परदेशी मालास अटकाव करा,या महामंत्राचा जप चालला आहे. पण परदेशी मालास अटकाव झाल्यास लोकांस अधिक भावाचा स्वदेशी माल विकत घेणे भाग पडेल याचा विचार करावा कोणी?असे केल्याने देशाचे कल्याण होईल,असे म्हणण्याऐवजी देशातील भांडवलवाल्यांचे कल्याण होईल.कारण अनियंत्रित व्यापार पद्धतीत मिळत असलेला स्वल्प भावाचा माल नियंत्रित व्यापार पद्धतीत गोरगरीबांना अधिक दाम देऊन विकत घ्यावा लागणार आहे. यात त्यांची होणारी नागवण 'स्वदेशी' या लाडक्या शब्दाने भरून निघेल असे मानून ते समाधान पावतील असे संभवत नाही. सुसंपन्नतेच्या हा स्वदेशी मार्ग त्यांना भोवेल.'सन २०२१ मधील भारताच्या वास्तवाचे भाकित डॉ.आंबेडकरांनी आजपासून १०० वर्षापूर्वीच म्हणजेच १९२० मध्येच केलेले होते. आज दोन भारतीय भांडवलदार जगातील पहिल्या पाच श्रीमंत लोकांमध्ये विराजमान आहेत. दुस-या बाजूला विकासदराच्या बाबतीत बांग्लादेशानंतर भारताचा क्रमांक लागतोय. म्हणजेच भारतीय माणसाचे सरासरी उत्पन्न बांग्लादेशातील नागरिकांपेक्षा कमी आहे. भारतात मूठभर लोकांच्या हातात देशाची संपत्ती साठवल्या गेली आहे. जागतिकिरणाचा विचार आणि बाजारपेठेतील आंतरराष्ट्रीय स्पर्धा यांचा स्वीकार करण्याचे धाडस करायला भारताला १९९१ साल उजाडले. गॅट कराराचा स्वीकार करून एका अर्थाने डॉ. मनमोहनसिंह यांनी डॉ. आंबेडकरांच्या आर्थिक विचारांचाच



Scanned with CamScanner

तर अन्यांच्या तुलनेत त्याचे गुणोत्तर काय असावे?हे दोन प्रश्न मांडले. या वादात बाबासाहेबांनी विनिमय दर निश्चितीपेक्षा भाववाढ नियंत्रणास महत्त्व दिले. बाबासाहेबांनी त्यावेळी यासंदर्भात जे काही लिखाणकेले, प्रश्न उपस्थति केले, त्यातूनच अर्थव्यवस्थेच्या अत्यंत केंद्रस्थानी असलेली 'रिझर्व्ह बॅंक ऑफइंडिया' ही एक संस्था जन्माला आली.रिझर्व्ह बॅंक ऑफइंडियाचीस्थापनाच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांवर झालेली आहे.

८) रिझर्व्ह बॅंक ऑफइंडियाचे जनक डॉ.आंबेडकर : आपल्या 'द प्रॉब्लेम ऑफद रुपी' या पुस्तकात रुपयाच्या अवमूल्यनावर आंबेडकरांनी त्यांचे विचार मांडलेले आहेत. स्वतंत्र भारताचे चलन हे सोन्यात असावे,असा अर्थतज्ज्ञ लॉर्ड कान्स यांनी केलेला दावा आंबेडकरांनी खोडून काढला होता. त्याऐवजी सुवर्ण विनिमिय परिमाण (गोल्ड एक्सचेंज स्टॅंडर्ड) अमलात आणावे,अशी शिफारस आंबेडकरांनी केली. त्यासंदर्भात सन १९२५ साली स्थापन केलेल्या हिल्टनयंग आयोगापुढे त्यांनी साक्षही दिली. त्यानंतर सन १९३५ साली रिझर्व्ह बॅंक ऑफइंडियाची स्थापना करण्यात आली. भारताच्या मूलभूत आर्थिक विचारांचा पाया देखील आंबेडकरांच्या आर्थिकविचारांवर घातला गेला. आंबेडकरांच्या मते सुवर्ण विनिमय पद्धतीचा अवलंब करून ब्रिटीश सरकार रुपयाची किंमत कृत्रमिरीत्या चढी ठेवत असून,त्यामागे ब्रिटनमधून भारतात निर्यात करणाऱ्यांना जास्तीत जास्त नफा कसा होईल हाच विचार आहे. आंबेडकरांनी रुपयाच्या अवमूल्यनाची मागणी केली. रुपयाची सर्वसाधारण क्रयशक्ती जोपर्यंत आपण स्थिर करीत नाही तोपर्यंत रुपयाची किंमत अन्य कोणत्याही मार्गाने स्थिर होऊ शकत नाही.विनिमय पद्धतीत चलनाच्या दुखण्याची लक्षणे तेवढी कळू शकतात,तीत उपचार होऊ शकत नाहीत.

९) संशोधनातील सहिष्णूता :'द प्रॉब्लेम ऑफद रुपी' या डॉ. आंबेडकरांच्या प्रबंधाला ग्रंथरुप देतांना प्रा. एडविन केनन यांची प्रस्तावना आहे. लंडन स्कूल ऑफइकॉनॉमिक्समध्ये प्राध्यापक असलेले प्रा केनन हे तसे डॉ.आंबेडकरांच्या आर्थिक विचारांचे विरोधक आणि टिकाकार होते. डॉ. आंबेडकरांनी मात्र आपल्या ग्रंथाला त्यांनी प्रस्तावना लिहावी असा आग्रह धरला. यामधून संशोधनात विरोधकाला देखील मोठे मानण्याचा मोठेपणा आणि सहिष्णूता त्यांनी दाखवली. डॉ. आंबेडकरांनी रुपयाची समस्या मांडण्यापूर्वी यासंदर्भात विचार करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या समितीचे प्रा. केनन सदस्य होते. त्यांनी १८९३ साली यासंदर्भात आपले विचार व्यक्त केलेले होते. त्या अर्थाने केनन डॉ. आंबेडकरांचे विरोधकच म्हणावेलागतील. तरीही या ग्रंथाची प्रस्तावना लिहिण्याचा डॉ. आंबेडकरांचा आग्रह त्यांना नाकारता आला नाही. प्रा. केनन यांनी



https://mail.google.com/mail/u/0/#sent/QgrcJHrtwMDNjHtfjcfrCqSJMDL...
Scanned with CamScanner

आपल्या प्रस्तावनेत डॉ. आंबेडकरांची प्रतिपादन शैली आणि काही प्रसंगी प्रतिपादनात दिसणारी आक्रमकता यांचा उल्लेख केलेला आहे. असे असले तरी डॉ. आंबेडकरांच्या विचारातील ताजेपणा लक्षात घ्यायला हवा,असे प्रतिपादन प्रा. केनन आवर्जून करतात. त्याकाळच्या संशोधनातील सहिष्णूता आज आपण हरवून बसलो आहोत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चलनविषयक विचारांचा स्वीकार करण्यास विलंब झाला तरी आज त्यांचा सिद्धांत खरा ठरलेला दिसतो. जगाने अनुभवलेली दोन महायुद्धे आणि १९३० सालची महामंदी या प्रमुख घटनांनी 'सुर्वण परिमाण' ही चलन व्यवस्था संपण्यास सुरवात झाली. ग्रेट ब्रिटनने ही व्यवस्था सोडल्यानंतर तिचा झपाट्याने ऱ्हास झाला. अमेरिकेनेसुवर्ण विनिमय टिकवून ठेवले आणि ३५ डॉलर्सच्या बदल्यात एक औंस सोने याची खात्री दिली,परिणामी जगातील अनेक देशांनी आपापली चलने अमेरिकन डॉलर्सशी विशिष्ट विनिमय दराने जोडून घेतली. परंतु १५ ऑगस्ट १९७१ रोजी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष निक्सन यांनी डॉलर्सचे सोन्यात परिवर्तन न करण्याचा निर्णय जाहीर केल्यामुळे जगातील शेवटचे सुवर्ण परिमाण संपले. असे असले तरी डॉलर्स हे चलन आजही आंतरराष्ट्रीय चलन म्हणून प्रचलित आहे. २००८ नंतर अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेच्या सशक्तेविषयी साशंकता निर्माण झाली. त्यातच युरो चलन असलेल्या देशांनाकर्ज संकटाने हैराण केले. म्हणून 'सुवर्ण परिमाण' हा उपाय असू शकतो का ? याची चाचपणी जगात पुन्हा सुरूझाली आहे.म्हणजेच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्यासुवर्ण परिमाण या चलन विषयक सिद्धांताकडे जगाने पुन्हा वाटचाल सुरु केलेली दिसते.

संदर्भ:


१. प्रा.नरके हरी (संपा.), (२००८) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे 'बहिष्कृत भारत आणि मूकनायक', डॉ.डॉ.बाबासाहेब आंबेडकर,महात्मा फुले आणि राजर्षी शाहू चरित्र साधने प्रकाशन समिती, उच्च व तंत्र शिक्षण विभाग , महाराष्ट्र शासन.

२. डॉ. आंबेडकर बाबासाहेब,(जाने.२०१८), रुपयाची समस्या : त्याचे मूळ व त्यावरील उपाय(मराठी अनुवाद: प्राचार्य डॉ.सुभाष खंडारे),सुधीर प्रकाशन, वर्धा.


---


विभाग प्रमुख व सहयोगी प्राध्यापक,
वाणिज्य विभाग,
आर.एन.सी.आर्ट्स, जे.डी.बी.कॉमर्स, आणि
एन.एस.सी,सायन्स,महाविद्यालय,नाशिकरोड, नाशिक.





Scanned with CamScanner